प्रकरण पहिले

# संशोधनाची पार्श्वभूमी

१.१ नियोजनाची आवश्यकता
१.२ शैक्षणिक आकृतीबंध
१.३ नियोजन व प्रशासन
१.४ समस्या निवड
१.५ समस्येची गरज व महत्व
१.६ संशोधन समस्या विधान
१.७ पारिभाषिक संज्ञाच्या व्याख्या
१.८ संशोधनाची उद्दिष्ट्ये
१.९ संशोधनाची गृहितके
१.१० संशोधनाची व्याप्ती व मर्यादा
१.११ प्रकरण नियोजन

प्रकरण पहिले

# संशोधनाची पार्श्वभूमी

सध्या समाजामध्ये तीन प्रस्फोटांचा नेहमी उल्लेख केला जातो. ज्ञानाचा प्रस्फोट, लोकसंख्येचा प्रस्फोट आणि अपेक्षांचा प्रस्फोट, लोकसंख्येचा प्रस्फोट आणि अपेक्षांचा प्रस्फोट १७७२ साली जागतिक शिक्षण आयोगाच्या Learning to be च्या अहवालात शास्त्रासंबंधी एक उदाहरण आहे. ते असे, छायाचित्राचा शोध लागल्यापासून त्याचे प्रत्यक्ष आयोजन होण्यास ११२ वर्षे लागली. इलेक्ट्रिक मोटारीच्या तत्वांचा शोध लागल्यापासून त्याचे प्रत्यक्ष आयोजन होण्यास पासष्ट वर्षे लागली. याउलट अलिकडचे 'सोलर बॅटरीचा शोध लागल्यापासून तीन वर्षात तिचा उपयोग सुरु झाला. ट्रान्झिस्टरचा शोध लागल्यापासून त्याचा प्रत्यक्ष उपयोग फक्त दोन वर्षात होवू लागला आणि आता कॉम्प्युटरमधील एखादा कोर्स पूर्ण होण्याअगोदरच पुढील नवीन कोर्सची जाहिरात आलेली असते. म्हणजे जेवढ्या झपाट्याने ज्ञान वाढते आहे, तेवढ्याच झपाट्याने अपेक्षा वाढत आहेत. तेवढ्याच वेगाने त्यांची पूर्तता योग्य पद्धतीने करण्यासाठी नियोजनाची आवश्यकता आहे.

**१.१ नियोजनाची आवश्यकता** – उल्लेख केल्याप्रमाणे प्रत्येक गोष्टीच्या आयोजनासाठी नियोजनाची आवश्यकता असते. तर ज्या ठिकाणी बालके घडविली जातात ज्या ठिकाणी भारताचे भवितव्य आकारास येते त्याठिकाणी नियोजन नको का ? 'उद्दिष्टपूर्तीच्या दृष्टिने जो आराखडा तयार केला जातो' त्यास नियोजन म्हटले जाते.' अशी व्याख्याही आपण नियोजनाची करतो. किंवा दुसऱ्या पद्धतीने असे म्हणता येईल की, 'एखादे कार्य करण्यापूर्वी ते कसे करावयाचे हे अगोदर ठरविण्याच्या क्रियेला नियोजन म्हणतात'. यामध्ये येणाऱ्या संभाव्य अडथळ्यांचा विचार केला जातो. (तंत्रज्ञान व विज्ञान – पान – ८०, डॉ. साळी व करंदीकर).

नियोजन हा शब्द आता सर्वांच्या परिचयाचा झाला आहे. राष्ट्रीय नियोजनापासून वैयक्तिक कामाच्या प्रत्येक ठिकाणी नियोजनाचा वापर केला जातो. नियोजन हे सर्वव्यापी आहे. आजच्या युगात कोणत्याही कार्याच्या यशासाठी प्रशासन, व्यवस्थापन संघटन आणि नियोजन या महत्वाच्या बाबी आहेत. शिक्षण क्षेत्रात काम करत असताना दैनंदिन जीवनातील विविध घटकांमध्ये समन्वय, सुसूत्रता साधून योग्य चालवता येते.

**१.२ शैक्षणिक आकृतिबंध –**

भारतामध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणात एकसूत्रीपणा निर्माण करण्याची आणि व्यावसायिक शिक्षणाची तरतूद करण्याची गरज भासल्यानंतर भारत सरकारने डॉ. डी.एस. कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली आयोगाची स्थापना केली. या आयोगाने १९६४ मध्ये माध्यमिक व उच्च शिक्षणात एकसूत्रीपणा आणण्यासाठी व व्यावसायिक शिक्षणासाठी १० + २ + ३ हा शैक्षणिक नवा आकृतीबंध राबविण्याची सरकारला शिफारस केली.

भारतीय संसदेने 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ नुसार १० + २ + ३ हा नवा शैक्षणिक आकृतीबंध संपूर्ण देशभर राबविण्याचे मान्य केले. तत्कालीन केंद्रीय शिक्षणमंत्र्यांनी १२ मे १९७२ रोजी नवी दिल्ली येथे सर्व घटक राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची बैठक घेवून १० + २ + ३ हा नवा शैक्षणिक आकृतीबंध प्रत्येक घटक राज्यात राबविण्याची शिफारस केली. त्याप्रमाणे सर्व राज्यांनी हा नवा शैक्षणिक आकृतीबंध राबविण्याचे ठरविले.

कोठारी आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यात १९७५ – ७६ पासून १० + २ + ३ या नव्या शिक्षणाच्या आकृतीबंधांतर्गत 'उच्च माध्यमिक' हा नवा स्तर सुरु करण्यात आला. या उच्च माध्यमिक स्तरामध्ये इयत्ता ११ वी इयत्ता १२ वी या दोन वर्गांचा समावेश होतो. महाराष्ट्रात जून १९७५ पासून इयत्ता अकरावी व जून १९७६ पासून इयत्ता १२ वी सुरु करण्यात आली.

महाराष्ट्र सरकारने १९७५ – ७६ मध्ये इयत्ता अकरावीचे वर्ग प्रामुख्याने निवडक माध्यमिक शाळांना व काही वरिष्ठ महाविद्यालयांना उघडण्याची परवानगी दिली. १९७६ – ७७

मध्ये इयत्ता बारावीचे ही वर्ग या माध्यमिक शाळांमध्ये व वरिष्ठ महाविद्यालयामध्ये सुरु करण्यात आले. अशा रीतीने कनिष्ठ महाविद्यालयाचे वर्ग माध्यमिक शाळांशी व वरिष्ठ महाविद्यालयांशी संलग्न करण्यात आले.

ज्याठिकाणी माध्यमिक शाळांना जोडून उच्च माध्यमिकचे वर्ग आहेत तेथे त्या शाळेचे मुख्याध्यापक उच्च माध्यमिक वर्गाचे नियोजन आणि प्रशासन पाहतात. ज्याठिकाणी हे वर्ग वरिष्ठ महाविद्यालयांना जोडलेले आहेत तेथे त्या वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य कनिष्ठ महाविद्यालयाचे नियोजन आणि प्रशासन व्यवस्था पाहतात.

कोठारी आयोगाच्या शिफारशीनुसार काही या आकृतीबंधाची उद्दिष्टे ही खालीलप्रमाणे ठरविलेली होती.

१) १६ ते १९ या वयोगटातील विद्यार्थ्यांना व्यावसायिक व तांत्रिक सोयी उपलब्ध करुन देणे.

२) व्यावसायिक व बहुउद्देशीय शाळा स्थापन करणे.

३) कनिष्ठ महाविद्यालयामध्ये प्रशिक्षित व संशोधक वृत्तीचा शिक्षक तयार करणे.

४) विद्यार्थ्यामध्ये शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक मूल्यांचे संवर्धन करणे.

५) विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानाची वाढ करणे.

कोठारी आयोगाने वरीलप्रमाणे काही उद्दिष्टे सांगून शिक्षणाच्या नवीन आकृतीबंधाचे स्वरुप खालीलप्रमाणे सांगितले आहे.

१) एक ते तीन वर्षापर्यंत शालेय प्रवेशपूर्व शिक्षण असावे.

२) सात ते आठ वर्षाचे प्राथमिक शिक्षण असावे व त्याचे प्राथमिक व उच्च प्राथमिक असे दोन स्तर करावेत.

३) दोन वर्षाचे माध्यमिक शिक्षण असावे.

४) उच्च माध्यमिक शिक्षणाचा दोन वर्षाचा टप्पा असावा. त्यामध्ये व्यावसायिक शिक्षण देण्यात यावे.

५) पदवीपर्यंतचे उच्च शिक्षण हे तीन वर्षाचे असावे.

अशा रीतीने + २ स्तराची निर्मिती झाली व या स्तराच्या नियोजन आणि प्रशासनाची व्यवस्था करण्यात आली. या स्तरावर विद्यार्थ्यांना आपापल्या पात्रतेप्रमाणे व अभिरुचीप्रमाणे कला, विज्ञान, वाणिज्य व तांत्रिक शिक्षण इत्यादी शाखा निवडण्याचे स्वातंत्र्य आहे. अशाप्रकार कनिष्ठ महाविद्यालये ही महाराष्ट्रात सुरु झाली. पण त्यांची यशस्वीपणे अंमलबजावणी होण्यासाठी कर्तव्यदक्ष व सामर्थ्यवान अशा योग्य नियोजन आणि प्रशासनाची आवश्यकता आहे.

**१.३ नियोजन व प्रशासन –**

नियोजन व प्रशासनामध्ये प्रथम ध्येय आणि उद्दिष्ट निश्चिती करुन उपलब्ध असणाऱ्या साधनांचा, व मनुष्यबळाचा व वेळेचा विचार करणे गरजेचे असते. उपलब्ध असणाऱ्या साधनसामुग्री व मनुष्यबळाचा उपयोग हा सुयोग्यपणे व काटकसरीने करणे आवश्यक असते. कनिष्ठ महाविद्यालयाचे नियोजन करताना वर्षभरामध्ये मिळणारे कामाचे दिवस, उपलब्ध असलेला शिक्षकवर्ग, जबाबदाऱ्या अशा गोष्टींचा विचार करुन कामाची दिशा निश्चित केली जाते.

प्रशासनात कुशल नियोजनाचा व दूरगामी दृष्टिचा आविष्कार असतो. आखलेल्या योजनेप्रमाणे कनिष्ठ महाविद्यालयातील कामे पार पाडताना त्यावर नियंत्रण करावे लागते. एकंदरीत प्रशासनामध्ये कामाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करावी लागते. संस्थांतर्गत प्रशासनात प्राचार्य, शिक्षक, पर्यवेक्षक व विद्यार्थी यांचा समावेश होतो. विद्यार्थ्यांवर प्रत्यक्ष परीणाम करणारे घटक अंतर्गत प्रशासनात असतात तर बाह्य प्रशासन संस्था व शासन यांचा समावेश होतो. कनिष्ठ महाविद्यालय ज्या संस्थेमार्फत चालविले जाते त्या संस्थेच्या नियमांचे पालन संबंधीत प्राचार्यांना करावे लागते. कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रशासन प्राचार्य चालवतात व शिक्षक त्यांना मदत करत असतात. तर ते कशापद्धतीने प्रशासन चालवतात याविषयी अभ्यास प्रस्तुत संशोधनात केला आहे. याची गरज व महत्व पुढीलप्रमाणे सांगता येईल.

### १.४ समस्या निवड –

कनिष्ठ महाविद्यालय हे माध्यमिक शिक्षण व उच्च शिक्षणाला जोडणारा एक महत्वपूर्ण दुवा आहे. स्वाभाविकच या कनिष्ठ महाविद्यालयातून बाहेर पडणारा विद्यार्थी माध्यमिक शिक्षणाची उद्दिष्टे आत्मसात करुन उच्च शिक्षणाची उद्दिष्टे ग्रहण करण्यासाठी तयार झाला पाहिजे. कनिष्ठ महाविद्यालयातील काम अत्यंत निष्ठेने व प्रामाणिकपणे करण्याची प्रवृत्ती प्रत्येक प्राचार्यांच्या ठायी असणे आवश्यक असते. संशोधक वृत्ती व प्रवृत्ती हे कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या जीवनाचा एक अभिवाज्य अंग झाले पाहिजे. त्यांना उद्‌भवणाऱ्या शैक्षणिक समस्या व अध्यापन कार्याशी संबंधीत उद्‌भवणाऱ्या वेगवेगळ्या समस्या सोडविताना योग्य प्रकारचे निर्णय घेण्याची क्षमता त्यांच्यामध्ये असणे गरजेचे असते.

संशोधक गेल्या दीडवर्षापासून शिक्षणशास्त्र महाविद्यालयात आधिव्याख्याता म्हणून कार्यरत आहे. शिक्षणशास्त्रातील दैनंदिन अभ्यासामुळे व सेवा काळातील संपर्कामुळे शिक्षणाच्या या प्रक्रियेमधील काही कच्चे दुवे संशोधकाला आढळून आले आहेत. बी.एड. ला प्रवेश घेणारा विद्यार्थी हा पदवीधर असून ही तो काही किमान अपेक्षासुद्धा पूर्ण करु शकत नाही. त्याच्यामध्ये ध्येयवाद, चिकाटी, धैर्य नाही. बी.एड.ची पदवी ही कोठेतरी नोकरी मिळावी म्हणूनच तो प्राप्त करू इच्छितो. एक स्वत:ची आवड, म्हणून तसेच वेगवेगळ्या गोष्टींचे ज्ञान, विभिन्न क्षमता विकसीत व्हाव्यात म्हणून तो बी.एड. ला आलेला नसतो. हे एकंदरीत परिस्थीवरुन व अनुभवावरुन आढळून आले.

सध्या दिले जात असलेले प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व पदवी शिक्षण यामध्ये काहीतरी कमतरता, उणिवा राहत असाव्यात. हे शिक्षण विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनवू शकत नाही. बेकारी, नैराश्य, शिक्षणाबाबत उदासीनता वाढत आहे. कारण शैक्षणिक धोरण नीट राबवले जात नसावे. अशी शंका संशोधकाच्या मनात निर्माण झाली. प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व पदवी स्तरावरील नियोजन आणि प्रशासनामध्ये काही प्रमाणात निश्चितपणे उणिवा आसाव्यात असे वाटले.

उच्च माध्यमिक स्तराचा विचार करता काही कनिष्ठ महाविद्यालये ही माध्यमिक शाळांना तर काही कनिष्ठ महाविद्यालये ही (उच्च) वरिष्ठ महाविद्यालयांना जोडलेली आहेत. माध्यमिक शाळेतील वातावरण व महाविद्यालयातील वातावरण यामध्ये बराच फरक आहे. माध्यमिक शाळेच्या तुलनेत वरिष्ठ महाविद्यालयाचे वातावरण हे अधिक प्रभावी ठरते. माध्यमिक शाळांशी संलग्नित कनिष्ठ महाविद्यालयीन वर्गातील विद्यार्थी संख्या ६०-८० असते तर वरिष्ठ महाविद्यालयाशी संलग्नित कनिष्ठ महाविद्यालयीन वर्गातील विद्यार्थी संख्या १००-१२० असते. वरिष्ठ महाविद्यालयात प्राचार्य हे प्रशासक असतात. तर माध्यमिक शाळेत मुख्याध्यापक - अशा ठिकाणी मुख्याध्यापकांचे अधिक लक्ष हे माध्यमिकच्या वर्गांकडे तर वरिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्यांचे लक्ष हे उच्च महाविद्यालयीन वर्गाकडे असते. त्यामुळे काही प्रमाणात का होईना कनिष्ठ महाविद्यालयीन वर्गांकडे यांचे दुर्लक्ष हे होत असते.

कनिष्ठ महाविद्यालयाशी संबंधीत संपूर्ण नियोजनाचे आणि प्रशासनाचे सर्व अधिकार शिक्षण उपसंचालककाकडे देण्यात आले आहेत. त्यांच्यामार्फत माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी कनिष्ठ महाविद्यालयांच्या प्रशासनाची अंमलबजावणी करतात. माध्यमिक शाळांची संख्या जास्त आहे. त्यामुळे कनिष्ठ महाविद्यालयांच्या प्रशासनासाठी शिक्षण अधिकाऱ्यांना वेळ कमी पडतो. विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्याकडून वर्गमान्यता, शिक्षक मान्यता, विद्यार्थी प्रवेश, कनिष्ठ महाविद्यालयाची वार्षिक तपासणी, तसेच कनिष्ठ महाविद्यालयांची मान्यता इत्यादीबाबत अंमलबजावणी केली जाते. कनिष्ठ महाविद्यालयातील कार्यालयीन कामकाज वर्गातील विद्यार्थी संख्या, अभ्यासक्रम, वेळापत्रक, अध्यापन पद्धती, अध्यापक वर्ग, ग्रंथालय सुविधा, प्रयोगशाळा, शैक्षणिक साधने,इमारत, फर्निचर अनुदान व परीक्षा संदर्भात अनेक प्रश्न निर्माण झालेले दिसतात.

कनिष्ठ महाविद्यालयामध्ये प्रवेश घेणारा विद्यार्थी १६ ते १९ वर्षे वयोगटातील आहे. त्याकरिता शिक्षक हा सर्वांगाने परिपूर्ण व सुरक्षित आसावा. कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थीसंख्येच्या मानाने वर्ग, खोल्या, ग्रंथालय सुविधा, इतर सुविधा अपुऱ्या पडतात. विद्यार्थी

संख्येच्या मानाने वर्गखोल्या लहान आहेत, प्रयोगासाठी लागणारे साहित्य पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाही. आणि विद्यार्थी संख्येच्या मानाने इमारत कमी पडल्यास वर्ग दुबार पद्धतीने भरवितात.

अशा अनेक प्रकारच्या समस्या नियोजन आणि प्रशासन भेडसावतात. त्या उणिवांचा शोध घेण्याची गरज आहे. म्हणून संशोधकाने संशोधन कार्यासाठी प्रस्तुत विषय निवडला आहे.

**समस्येची गरज व महत्व –**

प्रत्येक देशाचा विकास हा त्या देशातील शैक्षणिक प्रगतीवरच अवलंबून असतो. शिक्षणप्रक्रियेमध्ये सर्वात जास्त महत्वाचा कनिष्ठ महाविद्यालयीन स्तर आहे. कारण त्याच दरम्यान विद्यार्थ्यांच्या भावी दिशा निश्चित होतात. त्यामुळे कनिष्ठ महाविद्यालयामधून बाहेर पडणारा विद्यार्थी हा कशा प्रकारचा आणि कोणत्या क्षमतेचा असेल हे त्या – त्या कनिष्ठ महाविद्यालयांवर अवलंबून राहते. आणि ज्या – ज्या कनिष्ठ महाविद्यालयाचा दर्जा, गुणवत्ता ही तेथील प्रशासनावर अवलंबून असते. त्यामुळे कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावरील नियोजन आणि प्रशासनाचा अभ्यास करणे महत्वाचे आहे.

नियोजनामध्ये पुढील गोष्टींचा विचार करावा लागतो.

१) नियोजन करताना सद्य:स्थितीचा आढावा घेणे आवश्यक असते.

२) उपलब्ध साधनसामग्रीची माहिती करुन घ्यावी लागते.

३) भविष्यकालीन स्थितीचा अंदाज बांधावा लागतो.

४) येणाऱ्या संभाव्य अडचणी लक्षात घेवून त्यावर मात करण्यासाठी उपाययोजना व कृतियोजना आखावी लागते.

५) उपलब्ध वेळेत कोणती उद्दिष्टे साध्य करावयाची याचे सतत भान ठेवावे लागते.

६) नियोजन हे लवचिक ठेवावे लागते. कारण कार्यवाही करताना काहीवेळा नियोजनातील कृतीयोजनेत बदल करावे लागतात.

या गोष्टींचा विचार करुन कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावरील प्रशासनासाठी प्रथम नियोजन केले जाते का नाही याविषयी माहिती घेणे आवश्यक आहे. कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावर काम करणाऱ्या शिक्षकांकडे दुर्लक्ष झालेले आहे. त्यामुळे त्यांच्यामध्ये एक प्रकारची उदासीनता निर्माण झालेली आहे. परिणामी त्यांच्या दैनंदिन कार्यावरही परिणाम जाणवतो. वाढत्या विद्यार्थी संख्येमुळे नवीन तुकड्या व कनिष्ठ महाविद्यालये निर्माण होत आहेत. परंतु शासन याबाबत उदासीनता दाखवते. त्यामुळे वाढती विद्यार्थी संख्याही आहे त्या तुकड्यांमध्येच सामावून घ्यावी लागते. शिक्षकांना अध्यापनाऐवजी विद्यार्थ्यांना नियंत्रित करणे हेच काम करावे लागते. शासन नवीन कनिष्ठ महाविद्यालयांना परवानगी देताना विना अनुदानित तत्वावर मान्यता देते. कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावर स्वतंत्र लिपीकाची सोय नसते. मात्र कनिष्ठ महाविद्यालयाचे जनरल रजिस्टर, हिशोब, पत्रव्यवहार, दाखले इत्यादी स्वतंत्र पाहिजे असे शासनाचे मत आहे. सध्याच्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या नियोजन आणि प्रशासनामध्ये जो एक प्रकारचा साचेबंदपणा निर्माण झाला आहे. तो दूर करुन नियोजन आणि प्रशासनामध्ये बदल व्हावा. सध्याचा नियोजन आणि प्रशासनाचा दृष्टिकोन बदलून कनिष्ठ महाविद्यालयाच्या नियोजन आणि प्रशासन पद्धतीत आणि कार्यात या संशाधनामुळे मार्गदर्शन मिळावे हा हेतू आहे मुख्याध्यापक, प्राचार्य आणि शिक्षक यांना कनिष्ठ महाविद्यालयाचे नियोजन आणि प्रशासन प्रावी होण्याबाबत मार्गदर्शन व संशोधनातून निश्चित मिळेल व त्याचप्रमाणे त्यांना सुधारणाही करता येतील.

शासनाकडून सतत दुर्लक्षित राहिलेल्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या या स्तराकडे शासनाचे व एकूणच संपूर्ण समाजाचे लक्ष वेधून कनिष्ठ महाविद्यालयातील आजच्या समस्या त्यांना समजाव्या व या स्तराचे महत्व समजावे. या वर्गानंतरच विद्यार्थी जीवनाला दिशा मिळते. भावी जीवनात डॉक्टर, इंजिनिअर किंवा अन्य वेगवेगळ्या क्षेत्रातील संधी शोधण्यासाठी बाहेर पडतो. त्यामुळे ह्या स्तराला सर्वात जास्त महत्व आहे. विद्यार्थी जीवनाच्या व एकंदरीत त्यांच्या संपूर्ण आयुष्याच्या वाटेवरचे अत्यंत महत्वाचे असे वळण आहे. आणि म्हणून संपूर्ण जीवनाला कलाटणी देणाऱ्या या स्तराकडे कोणाचेही दुर्लक्ष होवू नये ही संशोधकाची धडपड व इच्छा

सर्वांच्या लक्षात येईल व या कनिष्ठ महाविद्यालयीन स्तराची गुणवत्ता व दर्जा वाढविण्यासाठी नियोजन आणि प्रशासनात धारणा आहे. त्यामुळेच या स्तराच्या अंतर्गत नियोजन आणि प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास संशोधकाने केलेला आहे. आणि अशी अनेक संशोधने ही अशा प्रकारची वेगवेगळ्या स्तरासाठी व्हावीत ही अपेक्षा आहे.

**संशोधन समस्या –**

**'पंढरपूर शहरातील कनिष्ठ महाविद्यालयातील संस्थामधील शैक्षणिक नियोजन आणि प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास.'**

"A critical study of Institutional planning and administration of the Junio Colleges in Pandharpur City."

कोणत्याही गोष्टींतील सत्य बाजू शोधून काढण्यासाठी त्या गोष्टींचा अभ्यास करावा लागतो. म्हणजे संशोधन करावे लागते आणि हे संशोधन कार्य शास्त्रीय आहे. संशोधन कार्य हाती घेण्यापूर्वी प्रथम संशोधन समस्या निश्चित करावी लागते. समस्या निश्चित करतो तेव्हा त्यामध्ये अनेक संज्ञा विशिष्ट अर्थाने वापराव्या लागतात. संशोधन समस्या अधिक स्पष्ट व्हावी व संशोधनकार्याची मर्यादा लक्षात यावी या हेतूने संशोधन समस्या विधानातील महत्वाच्या संज्ञांच्या व्याख्या द्याव्या लागतात. म्हणून वरील संशोधन समस्या विधानातील महत्वाच्या संज्ञांच्या व्याख्या खालीलप्रमाणे दिलेल्या आहेत.

**संज्ञांच्या व्याख्या –**

**पंढरपूर शहर –**

महाराष्ट्रातील प्रमुख तीर्थक्षेत्रांपैकी पंढरपूर हे एक प्रमुख तीर्थक्षेत्राचे शहर.

**कनिष्ठ महाविद्यालय –**

शैक्षणिक आकृतीबंध १० + २ + ३ मधील + २ या स्तरात इयत्ता आकरावी वइयत्ता बारावी चे कला, विज्ञान व वाणिज्य शांचे वर्ग प्रामुख्याने येतात. दोन वर्षाच्या कालावधीमधील

या वर्गांना कनिष्ठ महाविद्यालय असे म्हणतात. हे वर्ग माध्यमिक शाळा व वरिष्ठ महाविद्यालय यांच्याधील दुवा आहेत.

**नियोजन -**

संकल्पनात्मक - आपल्या संस्थेच्या वाढीचे टप्पे ठरवून अथवा तिच्या समस्यांचा विचार करुन नियोजन आपल्या व्यवस्थापक मंडळाच्या साहाय्याने करणे म्हणजे नियोजन होय.

(शां.कृ. सोहनी, शैक्षणिक टीपाकोश)

**कार्यात्मक व्याख्या -**

प्रस्तुत संशोधनामध्ये संस्थेमध्ये उपलब्ध मनुष्यबळाचा सुयोग्य वापर करुन विविध उपक्रम, दैनंदिन शैक्षणिक कार्य इ. चे नियोजन करणे असा कार्यात्मक अर्थ अभिप्रेत आहे.

**संस्थांतर्गत शैक्षणिक नियोजन -**

**संकल्पनात्मक व्याख्या -**

शैक्षणिक उद्दिष्टे ठराविक कालखंडात साध्य करण्यासाठी उपलब्ध साधनसामुग्री व मनुष्यबळाच्या साहाय्याने कृतीची कार्यवाही निश्चित करण्याची प्रक्रिया म्हणजे शैक्षणिक नियोजन होय.

(प्रा. ताम्हणकर, 'शैक्षणिक प्रशासन व नियोजन')

**कार्यात्मक व्याख्या -**

प्रस्तुत संशोधनात शैक्षणिक नियोजन म्हणजे शैक्षणिक उद्दिष्टपूर्तीसाठी कोणकोणत्या गोष्टी कराव्या लागतील, त्याचा क्रम कोणता, उपलब्ध मनुष्यबळ व साधनसामुग्रीचा उपयोग कसा करुन घेता येईल याचा विचार करणे होय.

शैक्षणिक नियोजन म्हणजे प्राचार्य व शिक्षकांच्या अभ्यासपूर्वक कार्यक्रमाचे, अध्यापनाचे, आर्थिक, विभागवार, विषयवार, वार्षिक, परीक्षांचे दैनंदिन कामाचे, प्रवेश प्रक्रियेचे रजेच्या काळातील इत्यादी नियोजनाचा प्रस्तुत संशोधनामध्ये विचार केला आहे.

असा कार्यात्मक अर्थ प्रस्तुत संशोधनामध्ये अभिप्रेत आहे. प्रस्तुत संशोधनामध्ये केवळ संस्थांमार्फत शैक्षणिक नियोजनाचाच विचार केला आहे.

**प्रशासन –**

**संकल्पनात्मक व्याख्या –**

'निश्चित केलेल्या पद्धतीप्रमाणे कार्य करण्याच्या दृष्टिने निरनिराळ्या नियमांचा आणि आधिकारांचा वापर करुन एकूण कामावर नियंत्रण ठेवणे उपलब्ध साधनसामुग्री व मनुष्यबळ यांचा जास्तीत जास्त आणि परिणामकारक उपयोग होईल. अशा अनुरुप कार्यक्रमाद्वारे मानवी गुणांचा विकास प्रभावीपणे करण्याची प्रक्रिया म्हणजे प्रशासन होय.'

(ग.वि.ध अकोलकर (१९८९) 'शालेय व्यवस्थापन आणि प्रशासन, पुणे निलकंठ प्रकाशन, पृष्ठ – ०९).

**संस्थांतर्गत शैक्षणिक प्रशासन –**

**संकल्पनात्मक व्याख्या –**

'आपली शैक्षणिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी ठरविलेल्या नियमानुसार आपला अधिकार वापरुन जरुरीप्रमाणे काम करवून घेणे व करवून घेणे म्हणजेच शैक्षणिक प्रशासन होय.'

**कार्यात्मक व्याख्या –**

'या संज्ञेत महाविद्यालयातील प्राचार्य व शिक्षक यांच्या प्रशासकीय कार्यातील अभ्यासपूरक कार्यक्रम मार्गदर्शन नियंत्रण तसेच संस्थेतील व्यवस्था व कार्यवाही करणे आणि आखलेल्या योजनांची अंमलबजावणी म्हणजेच शैक्षणिक प्रशासन होय'. असा कार्यात्मक अर्थ प्रस्तुत संशोधनामध्ये अभिप्रेत आहे.

**चिकित्सक अभ्यास –**

**संकल्पनात्मक व्याख्या –**

एखाद्या विषयाचा संपूर्ण व सखोल अभ्यास करणे, हा अभ्यास कौशल्यपूर्ण व निश्चित अशा स्वरुपाचा असतो. ती एक अर्थपूर्ण चौकशी असते.

(C.V. Good, Dictionary of education.)

'संशोधन साधनांच्या साहाय्याने मिळवलेल्या माहितीचे वर्गीकरण, स्पष्टीकरण, विशदीकरण करुन सदर समस्येत सुधारणा होण्यासाठी मार्गदर्शक सूचनांद्वारे केलेले अध्ययन म्हणजे चिकित्सक अभ्यास.'

**संशोधनाची उद्दिष्टे –**

**मुख्य उद्दिष्टे –**

१) पंढरपूर शहरातील कनिष्ठ महाविद्यालयातील शैक्षणिक नियोजनाचा चिकित्सक अभ्यास करणे.

२) पंढरपूर शहरातील कनिष्ठ महाविद्यालयातील शैक्षणिक प्रशासनाचा अभ्यास करणे.

३) माध्यमिक शाळांना जोडलेल्या कनिष्ठ महाविद्यालयातील आणि वरिष्ठ महाविद्यालयांना जोडलेल्या कनिष्ठ महाविद्यालयातील शैक्षणिक आणि प्रशासनामध्ये तुलना करणे.

४) पंढरपूर शहरातील कनिष्ठ महाविद्यालयातील शैक्षणिक नियोजन आणि प्रशासनामध्ये सकारात्मक सुधारणा सुचविणे.

**उपउद्दिष्टे –**

१.१) पंढरपूर शहरातील कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य व शिक्षक यांच्या शैक्षणिक नियोजन पद्धतींचा चिकित्सक अभ्यास करणे.

१.२) पंढरपूर शहरातील कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य व शिक्षक यांना शैक्षणिक नियोजनामध्ये येणाऱ्या अडचणींचा चिकित्सक अभ्यास करणे.

२.१) पंढरपूर शहरातील कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य व शिक्षक यांच्या शैक्षणिक प्रशासनाच्या पद्धतीचा चिकीत्सक अभ्यास करणे.

२.२) पंढरपूर शहरातील कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य व शिक्षक यांना शैक्षणिक महाविद्यालयातील प्राचार्य व शिक्षक यांना शैक्षणिक प्रशासनामध्ये येणाऱ्या अडचणींचा चिकित्सक अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहितके –**

१) कनिष्ठ महाविद्यालयामध्ये कार्यरत मानवी घटकांना कामाचे शैक्षणिक नियोजन करताना अडचणी येतात.

२) कनिष्ठ महाविद्यालयांमधील शैक्षणिक प्रशासनामध्ये प्राचार्यांना अडचणी येतात.

३) कनिष्ठ महाविद्यालयातील नियोजन आणि प्रशासनामध्ये सुधारणा करता येतात.

**संशोधनाची व्याप्ती व मार्गदर्शन –**

**व्याप्ती –**

महाराष्ट्र राज्यामध्ये एकूण ३५ जिल्हे आहेत. त्यापैकी सोलापूर हा एक प्रमुख जिल्हा असून या जिल्ह्यामध्ये एकूण आकरा तालुके आहेत. त्यापैकी जिल्ह्यामध्ये एकूण आकरा तालुके आहेत. त्यापैकी पंढरपूर एक तालुका ठिकाणचे शहर आहे. पंढरपूर शहरामध्ये वेगवेगळ्या अशा अनेक शैक्षणिक संस्था आहेत. पंढरपूर शहरात एकूण पाच कनिष्ठ महाविद्यालये आहेत. प्रस्तुत संशोधन कार्यासाठी एकूण सर्वच्या सर्व पाच कनिष्ठ महाविद्यालयातील नियोजन आणि प्रशासनाचा संशोधकाने अभ्यास केला आहे. या अभ्यासासाठी पंढरपूर शहरातील पाच कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य व शिक्षक यांच्याकडून माहितीचे संकलन केले आहे.

**मर्यादा –**

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर शहर हे क्षेत्र निवडले. १) प्रस्तुत संशोधन कार्य हे फक्त पंढरपूर शहरातील कनिष्ठ महाविद्यालयाशी संबंधीत आहे. २) या संशोधन कार्यामध्ये कनिष्ठ महाविद्यालयातील संस्थांतर्गत शैक्षणिक नियोजन आणि प्रशासनाचाच विचार करण्यात आला आहे. ३) यामध्ये प्रशासक म्हणून पाच कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्यांचाच विचार केला आहे. ४) तसेच या संशोधन कार्यामध्ये संस्थांतर्गत शैक्षणिक नियोजना संदर्भात कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य व शिक्षक या दोन घटकांचा विचार केला आहे. ५) प्रस्तुत संशोधन कार्य हे फक्त २००७-२००८ या कालावधी पुरतेच मर्यादीत आहे.

**प्रकरण नियोजन –**

प्रस्तुत संशोधनकार्याच्या प्रकरणाचे नियोजन खालीलप्रमाणे करण्यात आले आहे.

**प्रकरण पहिले –**

प्रस्तुत संशोधनाच्या पहिल्या प्रकरणात संशोधनाची प्रस्तावना, समस्या निवड, समस्येच्या संशोधन कार्याची गरज व महत्व, समस्या विधान, समस्या विधानातील संज्ञांच्या व्याख्या, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची गृहितके व संशोधनाची व्याप्ती व मर्यादा याबाबत स्पष्टीकरण केलेले आहे.

**प्रकरण दुसरे –**

प्रस्तुत संशोधनाच्या दुसऱ्या प्रकरणामध्ये संशोधनाशी संबंधीत साहित्याचा अभ्यास करण्यात आला आहे. तसेच संबंधीत संशोधनांचे समालोचन करण्यात आले आहे. व प्रस्तुत संशोधन हे वेगळे कसे आहे याबाबत स्पष्टीकरण दिलेले आहे.

**प्रकरण तिसरे –**

प्रस्तुत प्रकरणामध्ये कनिष्ठ महाविद्यालयामधील संस्थांतर्गत शैक्षणिक नियोजन आणि प्रशासनातील कार्यालयीन कामकाज, विद्याथीर संख्या, अभ्यासक्रम, वेळापत्रक, अध्यापन

पद्धती, शिक्षक, ग्रंथालय, प्रयोगशाळा, शैक्षणिक साधने, परीक्षा व मूल्यामापन यासंदर्भात कनिष्ठ महाविद्यालयातील शैक्षणिक नियोजन आणि प्रशासनातील तात्विक घटकांचे स्पष्टीकरण करण्यात येईल.

**प्रकरण चौथे –**

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधनाची पूर्वतयारी, नमुना निवड, संशोधनाची साधने, प्रश्नावली व मुलाखत, संशोधनाची कार्यपद्धती या संबंधीचे स्पष्टीकरण करण्यात आले आहे.

**प्रकरण पाचवे –**

प्रस्तुत पाचव्या प्रकरणामध्ये मुलाखत व प्रश्नावलीच्या सहाय्याने प्राचार्य व शिक्षक यांच्याकडून संकलित केलेल्या माहितीचे वर्गीकरण, विश्लेषण व अर्थनिर्वचन केले आहे.

**प्रकरण सहावे –**

प्रस्तुत सहाव्या प्रकरणामध्ये संकलित केलेल्या माहितीवरुन केलेल्या अर्थनिर्वचनाच्या साहाय्याने निष्कर्ष काढण्यात आलेले आहेत. तसेच या काढलेल्या निष्कर्षांचा आधार घेवून काही शिफारशी करण्यात आल्या आहेत. व पुढील शिफारशी करण्यात आल्या आहेत व पुढील संशाधनासाठी विविध विषय सुचविण्यात आले आहेत.